Peer Reviewed

ISSN 2454-8332

# IMPACT FACTS

Quarterly- Vol.6 • Issue 1 • 15 Sept. - 14 Dec. 2020 • Rs.100/-

International Interdisciplinary Multilingual Research Journal

Editor

Dr.Kailas G.Kaninde

# INDEX



| SR. NO. | PAPER TITLE | AUTHOR NAME | PAGE NO. |
|---|---|---|---|
| 01 | MAHARASHTRA RURAL EMPLOYMENT GUARANTEE SCHEME (MREGS) AND IT'S IMPACT ON LABOUR MIGRATION IN MARATHWADA REGION | Dr. Kailas G. Kaninde | 01 |
| 02 | SMALL SCALE INDUSTRIES AND HUMAN RESOURCE MANAGEMENT: SPECIAL REFERENCE TO MARATHWADA REGION | Dr.Sidharth S.Jadhav | 06 |
| 03 | ONLINE EDUCATION IN INDIA: CHALLENGES AND OPPORTUNITES | Dr. Anurath M. Chandre | 13 |
| 04 | Representation of Socio-economic Agony of the Dalit Family in the Story '*Kafan*' by Premchand | Prin. Dr. Chandrakant R. Mandlik | 19 |
| 05 | The Portrayal of Region in R. K. Narayan and Alice Munro | Bhosale Gajanan Vishwanath | 22 |
| 06 | Profanity As an Aggression : A Critical Study of *Sultry Days* | Prof. Atmaram Gangane<br>Mr. Shivaji Londhe | 26 |
| 07 | हिन्दी दलित आत्मकथाकार ओमप्रकाश वाल्मीकिजी का बचपन | डॉ. सुखदेव रामा पाटील | 35 |
| 08 | पंचायतराज व्यवस्थेतील महिलांची भूमिका | प्रा. डॉ. राहुल पंडित | 37 |
| 09 | परधान आदिवासी जमातींच्या शिक्षण विषयक दृष्टिकोनाचा समाजशास्त्रीय अभ्यास | आरमाळकर अर्पणा विश्वनाथ | 40 |
| 10 | ग्रामीण आदिवासी स्त्रियांच्या आरोग्याच्या समस्या : एक अध्ययन | शेळके सुदर्शन किशनराव | 45 |
| 11 | घिसाडी जमातीच्या कौटुंबिक जीवन पध्दतीचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास | डॉ.कैलास कानिंदे | 50 |
| 12 | जनतेनेच चिंतन करून कृती करण्याची गरज | भैय्यासाहेब तुकाराम गोडबोले | 55 |
| 13 | वडार जमातीच्या आर्थिक समस्या: एक समाजशास्त्रीय दृष्टिक्षेप | प्रा. घोगरे साईनाथ रामजी | 58 |
| 14 | संत कान्होपात्रा : अभंग चिकित्सा | प्रा.डॉ. जाधव ज.तु. | 62 |
| 15 | राजा राममोहन रॉय यांचे सतीप्रथे विषयी कार्य | शिंदे गणेश शेषराव | 67 |

# संत कान्होपात्रा : अभंग चिकित्सा

**प्रा.डॉ. जाधव ज.तु.**
मराठी विभाग प्रमुख,
दिगंबरराव बिंदू महाविद्यालय,भोकर जि.नांदेड

**सारांश**

*पंधराव्या शतकातील संत कवयित्रीच्या मालिकेतील एक बंडखोर संतकवयित्री म्हणून उल्लेख करावा लागतो. संत कान्होपात्राचा जन्म एका नायकिणीच्या पोटी झाला होता. ती रूपाने अतिशय सुंदर होती. तसेच तिचा आवाजही अतिशय सुंदर होता. आपल्या जन्म दिलेल्या आईकडूनच तिने नृत्याचे गुण बालवयातच उपजत केले होते. आपल्या नृत्य कलेचा वापर पोट भरण्यासाठी न करता, ईश्वराची सेवा व भक्ती करण्यासाठी करावा असे तिचे ध्येय होते. बालवयातून तारूण्याकडे वाटचाल करताना कान्होपात्रा अनेक प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न करीत होती. परंतु या प्रश्नांकित जीवनाच्या वाटचालीत तिला कोणत्याही गुरूचे समर्थ मार्गदर्शन प्राप्त झाले नाही. ज्ञानेश्वरांची समाधी पंढरपूरची विठ्ठलमूर्ती पाहून ती स्वतःच्या अंतःप्रेरणेने आपली पारमार्थिक वाटचाल केली. हलक्या कुळात वा जातीत आपला जन्म झाल्यामुळे तिला कमालीचे दुःख वाटत होते. ती तरूण वयात आल्यानंतर अनेक रंगेल वृत्तीचे धनिक तिच्या शरीराच्या वासनेची वाट पाहत होते. अशा वेळी तिने पंढरपुरात जाऊन विठ्ठलाच्या पायावर आपला देह समर्पित केला. कान्होपात्राचे मोजकेच अभंग उपलब्ध असून त्यात प्रामुख्याने करूणा व जीवघेणी तळमळ जाणवते.*

**बीजसंज्ञा –** कान्होपात्राचे चरित्र, ज्ञानेश्वरवादी भावंडे, वासना, ईश्वरमहिमा, पंढरीमहिमा, विठ्ठलमहिमा

**प्रस्तावना**

आपण हीन, दीन व अस्पृश्य जातीतले आहोत या चिंतेने कान्होपात्रा कमालीची चिंताग्रस्त व दुःखी झाली होती. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या पारमार्थिक जीवनात 'माणूस' या शाश्वत मूल्यांचा उद्घोष केला होता. 'म्हणोनि कुळजातीवर्ण । आवघेचि गा अकारण ।। एथ अर्जुना माझेपण ।।' या कृष्णाच्या म्हणण्यानुसार कोणत्याही भक्ताला जातीचा गंध नसतो. पंथाचा गंध नसतो, तर भक्तामध्ये फक्त आणि फक्त माणुसकीचा श्वास असतो. तरीही कान्होपात्राला वासनावादी समाजाशी तीव्र संघर्ष करावा लागला. समाजातील ज्या माणसांच्या ओठावर माणूसकीचे अभंग आहेत. ओठात समता आहे, भक्ती आहे, पण दुर्दैवाने पोटात मात्र वासनेची दुर्गंधी आहे. तत्कालीन सामाजिक जीवनातील दाहकता कान्होपात्रांनी आपल्या अभंगातून स्पष्ट केली आहे. आईचा शरीर विक्रीचा व्यवसाय आणि कान्होपात्राचे सौंदर्य यामुळेच तिला आपला देह संपवावा लागला असेच म्हणावे लागते.

**कान्होपात्राचे चरित्र**

महाराष्ट्रातील पंढरपुरापासून जवळच असलेल्या मंगळवेढा, जि.सोलापूर या गावी कान्होपात्राचा 'श्यामा' या गणिकेच्या पोटी तिचा जन्म इ.स.१४६८ मध्ये झाल्याचे अभ्यासकांचे मत आहे. तिच्या जन्म व मृत्यूविषयी अभयासकांमध्ये मतभिन्नता दिसून येते. मंगळवेढा या नगरीला 'मंगोडा' असेही म्हटले जाते. या भूमीत संत दामाजी, संत चोखामेळा, संत गोपाबाई, स्वामी समर्थ, संत बसवेश्वर महाराज, बाबा महाराज आर्वीकर, संत बागडे महाराज यासारख्या संतांचे येथे वास्तव्य राहिलेले होते. विशेषतः याच मंगळवेढ्यात छत्रपती शिवाजी महाराजांनी चार दिवस मुक्काम केला होता. पंढरपुरपासून ही नगरी अवघ्या तेवीस किलोमीटर अंतरावर आहे. येथे ज्वारीची मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. मंगळवेढ्याच्या दक्षिणेकडील भागात कन्नड ही भाषा बोलली जाते.

'कान्होपात्रा' ही मंगळवेढा, जि.सोलापूर येथील राहणारी ती श्यामा नामक नायिकिणीची मुलगी असून ती अतिशय देखणी होती. कान्हो वा कान्हू असे तिचे नाव असून 'पात्रा' हे तिचे आडनाव नसून व्यवसायदर्शक विशेषनाम आहे. यादवकालीन मराठी कवींच्या व्यक्तिनिदर्शक प्रथम नावापुढे व्यवसाय व जातीसूचक उल्लेख करण्याची प्रथा होती. जशी नामा शिंपी, सावता माळी, गोरा कुंभार, सेना न्हावी, संत चोखोबा, त्याचा पुत्र कर्ममेळा यांच्या नावासमोरही 'मेळा' असा जातीनिदर्शक उल्लेख आहे. भागू महारीण, चोख्याची महारी (सोयराबाई) यांच्या नावात तर जातीचा स्पष्ट उल्लेख आहे. 'कान्होपात्रा' या नावातही कान्हो हे व्यक्तिदर्शक नाव, तर 'पात्रा' हा व्यवसाय निदर्शक शब्द आहे. यादवकाळात 'पात्र' या शब्दाचा अर्थ गणिका वेश्या असा प्रचलित होता. 'महाराष्ट्र शब्दकोशा'तही 'पात्र' या शब्दाचा हाच अर्थ नोंदविला आहे. यादवकालीन महानुभावीय ग्रंथ दृष्टांतपाठ यातही 'पात्र' शब्द याच अर्थाने आला आहे.'[१] अशा या गणिकेच्या हीन कुळात कान्होपात्राचा जन्म झाल्यामुळे तिला आपल्या वडिलाचे नाव, प्रेम व छत्रही

लाभले नाही. फक्त आईचे प्रेम लाभले. ती लहानाची मोठी होऊ लागली तशी वाईट लोकांच्या नजरा तिच्याकडे पाहतच होत्या. कान्होपात्राचं हे तिचे घर म्हणजे जणू सगळ्यांच्या पापाचे घरच होते. उच्चवर्णीय, धनिक व हीन लोकही तिथे जायचे. अशा वासनांनी धुंद झालेल्या समाजात तिला तिच्या आईशिवाय इतर कुणाकडूनही प्रेम व आधार मिळाला नाही. मंगळवेढ्यातील कान्होपात्रा वयाच्या इतर मुली त्यांच्या-त्यांच्या आईसोबत देवाच्या दर्शनासाठी, भजन व कीर्तन ऐकण्यासाठी देवळात जात असत. कान्होपात्रालाही देवळात जाण्याची इच्छा होत होती, पण तिला देवळात जाता आले नाही. कान्होपात्राला जीवलग मैत्रिणी मिळू शकल्या नाहीत. कोन्होपात्रा ही आपल्या आईला सारखे प्रश्न विचारीत असत. ती आपल्या आईला म्हणायची, आई, तू मला रोज रात्री घरी ठेऊन तूच देवळात जातेस, मला नेत नाहीस. उजेडात मला देवाची मूर्ती पाहावयाची आहे. मला किमान एकदा देवळात घेऊन जाशील का ? तेव्हा आई तिला समजावून सांगताना म्हणायची, 'दिवसाला घरंदाज बायका देवळात जातात, आपणास दिवसाला देवळात जायला परवानगी नाही' कान्होपात्रांच्या अशा प्रश्नांना आई टाळायची. तिला कसे समाजावून सांगावे, हेच तिच्या आईसमोर धर्मसंकट उभे टाकत होते. कान्होपात्राची बाल्यावस्था संपून ती आता तरूण वयात प्रवेश करीत होती. तिच्या तारूण्याचे सौंदर्य जणू एखाद्या फुलाप्रमाणे फुलत चालले होते. तशी ती सुंदर दिसत होती. रंगेल माणूस तिच्या सौंदर्याकडे पाहून दिवास्वप्ने पाहत होता. धनाड्य लोक तिच्या शारीरिक प्राप्तीची लालसा करीत होते. कान्होपात्रा ही मात्र निरागस होती, अशा वासनेच्या दुर्गंधीचा तिचा गंधही नव्हता. ती आपल्या आईच्या मार्गदर्शनाखाली नृत्य व गायनात दंग होत होती. ती आपले देहभान विसरून अगदी भक्तिभावाने भजन, नृत्य व अभंगांचे गायन करायची. संत ज्ञानेश्वर व संत नामदेवांच्या अभंग गायनात रमायची. श्रीकृष्णाच्या रूपात रंगून जायची.

कान्होपात्रा आता तरूण झाल्यामुळे तिचे सौंदर्य प्रत्येकांच्या डोळ्यात भरत होते. ती थोडीफार अक्षरज्ञान प्राप्त केली होती. तिला आता सर्व काही समजत होते. तिचे सौंदर्य, नृत्य, गायन, गोड आवाज आणि श्यामा व गणिकेची कन्या म्हणून तिची सर्वत्र कीर्ती पसरलेली होती. कान्होपात्राच्या सौंदर्याने तिची आई श्यामा ही प्रसन्न व समाधानी झाली होती. तशी ती एके दिवशी कान्होपात्राला म्हणाली, 'राजवाड्यात जाऊन आपण राजाची भेट घेऊ, राजा तुला खूप द्रव्य देईल.' आईच्या या प्रश्नावर कान्होपात्रा म्हणाली, 'आई, मला माझं सौंदर्य विकायचं नाही.' मुलीचे हे उत्तर ऐकून तिची आई शांत झाली. आपली मुलगी 'देव-दासी' होणार अशी तिची खात्री झाल्यामुळे ती कान्होपात्राला राजाकडे घेऊन जाण्याचा निर्णय रद्द करते. कान्होपात्राचा संत माहात्म्यांवर विश्वास होता. विठ्ठलाच्या भक्तीवर विश्वास होता. एकीकडे ती तारूण्यात सौंदर्यांनी खुललेली होती, तर दुसरीकडे ती उदास व दुःखी झाली होती. सभोवतालच्या घाणेरड्या लोकांचा तिला तिरस्कार वाटत होता. वैचारिक प्रगलभता वाढल्यामुळे तिला समाजजीवनातील वास्तव समजत होते. आईचे आणि समाजातील धनिक वासनावादी लोकांचे सत्य तिला समजले होते. तिने श्रीकृष्णाला आपले आयुष्य समर्पित केले होते. आपण हीन कुळात जन्माला आल्याने परमेश्वर आपला उद्धार करेल की नाही या विषयाने ती चिंताग्रस्त व अस्वस्थ बनली होती. त्यामुळे भक्तीमार्गाचा अवलंब करून ती कृष्णरूप झाली होती. तिने जणू कृष्णसख्याची 'देव-दासी' होण्याचा दृढ संकल्प केला होता.

एके दिवशी वारकरी मंगळवेढ्यातून 'जयजय रामकृष्ण हरी'चा जप करीत पंढरपुराकडे चालले होते. टाळ मृदंगाच्या तालावर विठ्ठलनामाचा जप करणारी वारकरी मंडळी देहभान विसरून गेली होती. आपल्या जातीचा, धर्माचा व पंथांचा भेदाभेद न करता ते सर्व विठ्ठलनामाच्या या भक्तिपंथात एकत्र आली होती. तितक्यात कान्होपात्रा पुढे जाऊन एका वारकरी संतांचे पाय भरून आपल्या हृदयात खदखरदणाऱ्या दुःखाश्रूंना तिने मोकळी वाट करून देत म्हणाली, 'तुम्ही कुठे चालला आहात.' 'आम्ही पंढरपुरला जात आहेत' असे सांगून वारकरी कान्होपात्राला म्हणाला, 'तू का रडते आहेस,' तुला कोणते दुःख आहे, ते मला सांग ? वारकऱ्याच्या या बोलण्यामुळे तिला समाधान वाटले. आपल्या डोळ्यातील अश्रू पुसत म्हणाली, 'महाराज, मी एका नायकिणीची मुलगी आहे. मला माझ्या आईसारखं पोटाकरिता देहविक्री करायची नाही. वासनांनी नासलेल्या या बाह्य जगाचा मला तिरस्कार वाटतो. माझ्यासारख्या गणिकेच्या मुलीला देवाच्या दरबारी स्थान मिळेल का ?' तेव्हा वारकरी म्हणतो, 'देवाच्या दरबारी कुणीही हीन नसतो. सर्व भक्तांवर तो सारखीच माया करतो. त्याच्या मनात उच्च-नीच असा कोणताही भेदभाव नसतो?' तेव्हा कान्होपात्रे म्हणते, 'मी तुमच्याबरोबर पंढरपुरला आल्यास पांडुरंग माझा स्वीकार करील का ?' यावर वारकरी कान्होपात्राला समजावून सांगताना म्हणतो, 'पांडुरंग हा भक्तीचा भूकेला आहे. पिंगळा नावाच्या गणिक मुलीचा त्याने उद्धार केला आहे, तसाच तो तुझाही उद्धार करणार !' यांमुळे कान्होपात्रा ही आपल्या आईच्या परवानगीने वारकरी मंडळीसोबत पंढरपुरात पोहचली. चंद्रभागेत स्नान करून पांडुरंगाच्या दर्शनासाठी देवळात गेली. पांडुरंगाचे दर्शन घेऊन तिने आता आपले संपूर्ण जीवन पंढरपुरातच घालविण्याचा निश्चय केला. पांडुरंगाच्या देवळात गाणी. कीर्तन व भजनात ती रमली होती. आईची आठवण झाली की, ती मंगळवेढ्याला जायची व परत पंढरपूरला यायची, असा तिचा जीवनक्रम ठरला होता. शामाचे आता वय झाले होते, अशावेळी कान्होपात्राने भक्तीमार्ग सोडून आपलाच धंदा करावा असे तिच्या

आईला वाटत होते. 'समाज तुझा उद्धार कधीच होऊ देणार नाही,' म्हणून आई कान्होपात्राला समजावून सांगत होती. परंतु कान्होपात्रा मात्र जिवंतपणाच्या नरकयातना भोगायला तयार नव्हती. म्हणून पंढरपुरात कान्होपात्राची प्रतिभा उंच भरारी घेत अभंग लेखन करू लागली होती.

कान्होपात्राच्या तारूण्याची व सौंदर्याची कीर्ती सर्वत्र पसरली होती. कान्होपात्रा ही आपल्या आईला भेटण्यासाठी पंढरपूरहून मंगळवेढ्याला आली होती. कान्होपात्राच्या सौंदर्याने प्रभावित होऊन बिदरच्या बादशहाने कान्होपात्रास आणण्यासाठी आपले काही शिपाई मंगळवेढ्यास पाठविले. बादशहाची इच्छा समजल्यावर कान्होपात्राला कमालीचे दुःख झाले. बिदरला जाण्यापूर्वी पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचे दर्शन घेण्याची तिने इच्छा व्यक्त केली. या संकटातून मला पांडुरंगाशिवाय कुणीही वाचवू शकणार नाही. याची तिला खात्री पटली होती. बादशहाचे शिपाई व कान्होपात्रा एकदाचे पंढरपूरला गेले. मंगळवेढा ते पंढरपुरच्या प्रवासात कान्होपात्रा ही अखंडपणे पांडुरंगाचे नामस्मरण व प्रार्थना करीत होती. पंढरपुरात गेल्यानंतर ती चंद्रभागेत स्नान करून शेवटच्या दर्शनासाठी पांडुरंगाच्या मंदिरात धावा करीत केली. आपल्या हातात वीणा घेऊन बेधुंद व आत्मभान हरवून विठ्ठलाशी प्रार्थना करीत होती. 'माझा देह तुझ्यात विलीन होऊ दे, समर्पित होऊ दे' म्हणून कान्होपात्रा पांडुरंगाकडे याचना करीत होती. विनवणी करीत होती. कान्होपात्रा पांडुरंगासमोर धरणीवर पडली होती. तिच्या वीणातून 'पांडुरंग-पांडुरंग-पांडुरंग' असे शब्द बाहेर पडून तिच्या देहातील आत्मा परमात्म्यामध्ये विलीन झाला होता. पुजाऱ्यांनी कान्होपात्राचा देह देवळात दक्षिणद्वारी नेऊन पुरला. त्या जागेवर तरटीचा वृक्ष उगवला. तिथे तिची समाधी बांधण्यात आली असून त्या जागेवरील तरटीचा वृक्ष हा कान्होपात्राच्या त्यागी जीवनाची साक्ष देतो. कान्होपात्राला सुमारे पंचवीस ते तीस वर्ष आयुष्य लाभले असावे. समाजातील रंगेल व्यवस्थेने कान्होपात्राचा बळी घेतला, असेच शेवटी म्हणावे लागेल.

**कान्होपात्राचे अभंग**

'सकल संत गाथे'मध्ये कान्होपात्राचे तेवीस अभंग दिसून येतात. इ.स.१७७७ मध्ये बसवलिंग यांनी कान्होपात्राचे लिहिलेले एक दुर्मिळ चरित्र इ.स.२०१५ मध्ये अभ्यासकांच्या हाती लागलेले असून यात कान्होपात्रांचे ३६ ओव्यांमधील चरित्र शब्दबद्ध केल्याचे दिसून येते. कान्होपात्राच्या उपलब्ध असलेल्या अभंगामध्ये करूणा व भक्तीची व्याकुळता दिसून येते. तिने आपल्या अभंगातून ज्ञानेश्वर भावंडाचा गौरव, विठ्ठलमहिमा, पंढरीमहिमा, ईश्वरमहिमा वर्णिला आहे. कान्होपात्रा ही तशी प्रेमळ व गोड आहे, तसेच तिच्या अभंगातूनही तिच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन होते. प्रसंगी ती आपल्या अभंगातून परखड भाषेचाही वापर केल्याचे दिसून येते.

**ज्ञानेश्वरादी भावंडे**

वारकरी संप्रदायातही सर्वांना सामावून घेणारे संत ज्ञानेश्वर व त्यांची भावंडे ही कान्होपात्राला 'परमेश्वराची अवतार' वाटतात. ही भावंडे सर्वसामान्य माणसे नसून ती साक्षात ईश्वराचे अंश आहेत, अशी तिची धारणा आहे. अशा ज्ञानेश्वरादी भावंडाविषयीचा गौरव व आदर व्यक्त केला आहे. पैठणच्या कर्मठ धर्ममार्तंडांना आपण आपल्या दिव्यशक्तींनी प्रचिती दिलात. निर्जिव भींत चालवून आपण गविष्ठ माणसांचा अहंकार दूर केलात. अशा ज्ञानेश्वराचे समाधीस्थळ संतांसाठी अलंकापूर आहे. भागीरथी, सरस्वती व मनकर्णिका या नद्यांचा येथे संगम आहे. या नद्यांमध्ये स्नान करणाऱ्या भक्तांना वैकुंठ प्राप्त होते.

**वासना**

कान्होपात्राचा जन्म हा गणिकेच्या हीन कुळात झाल्यामुळे तिच्या मनात वासनेविषयी प्रचंड तिरस्कार आहे. तिला आईच्या या व्यवसायाचा उब आलेला आहे. या वासनेमुळे माणसांचा फक्त विनाशच होतो. माणसांचा मान-सन्मान व प्रतिष्ठा नष्ट करणाऱ्या अशा या वासनेचा निषेध व्यक्त केला आहे. माणसांचा हा देह नाश पावणारा आहे. कान्होपात्राने इंद्र व रावणासारखे पौराणिक दाखले देऊन या सुखाच्या आहारी गेल्यास माणसांचा अपमान व फजिती होते हे तिने स्पष्टपणे सूचित केले आहे. कान्होपात्राच्या या तत्त्वज्ञानात्मक विचारात आत्मानुभूतीचे प्रतिबिंबही दिसून येते.

**ईश्वरमहिमा**

स्वर्ग, जन्म, मृत्यू, यम, पाप, पुण्य, ईश्वर यावर अनेक संतांचा विश्वास होता. म्हणूनच कान्होपात्रालाही ईश्वराचे अस्तित्व, त्याची शक्ती आणि प्रत्येक भक्तांचा उद्धार करण्याची सिद्धता यावर तिचा कमालीचा विश्वास आहे. माणसांच्या जवळ आलेल्या मृत्यूलाही परत पाठविण्याची ताकद ईश्वराच्या नामस्मरणात आहे, अशी तिची धारणा होती. ईश्वर हा कोणत्याही भक्ताची जात, धर्म व पंथ न पाहता तो प्रत्येकांची काळजी करणारा आहे. त्याला अंतरिक भक्तीची गरज असते. तो भक्ताच्या भक्तीचा भूकेला असतो. म्हणूनच ती पंढरीच्या विठ्ठलामध्ये ईश्वराचे रूप पाहते. विठ्ठल हाच तिला आधार देणारा, तिचा उद्धार करणारा व दुःख नाहिसे करणारा जणू बापच वाटतो.

**पंढरपूरमहिमा**

पंढरपूर हे संतांचे तीर्थक्षेत्र व वैकुंठ आहे. लग्न होऊन सासरी गेलेल्या मुलीला जशी माहेरची ओढ असते. अगदी त्याचप्रमाणे सर्व संतांना व भक्तांना पंढरीची ओढ असते. विठ्ठल हा दीन–दुबळ्या भक्तांचा पालक, पिता, माता व उद्धारकर्ता असून तो पंढरीत आहे. विठ्ठलाने भक्ताच्या कल्याणासाठी भूलोकीच राहण्याचे मान्य केले आहे. अशा पवित्र पंढरीचा 'पंढरपूरमहिमा' स्पष्ट केला आहे. विठ्ठल हा विटेवर उभा आहे. विश्रांती, शांती, समृद्धी आणि भक्तांच्या उद्धारांचे माहेर म्हणजे पंढरी आहे. मानवतेच्या भक्तीची गंगा या पंढरीत आहे, म्हणूनच कान्होपात्रांनी पंढरपूरमहिमा मुक्तपणे गायिला आहे.

**विठ्ठलमहिमा**

अनेक संतांनी व भक्तांनी विठ्ठलमहिमा गायिला आहे. विठ्ठल हा भक्तांच्या दुःखाचे निवारण करतो. भक्तांचा उद्धार करतो. आपले वेगवेगळे अवतार वा रूप धारण करून तो प्रत्येकांच्या मदतीला धावून जातो. तो कधी वैराग्याच्या रूपात, कधी आई–वडिलांच्या रूपात, कधी मित्र–मैत्रिणीच्या रूपात, कधी साधू, संत व भिक्षूच्या रूपात, तर कधी प्रत्यक्ष रूपात तो भक्तांना दर्शन देऊन भक्तांचे दुःख निवारण करतो. बहुतेक संत कवयित्रींनी या विठ्ठलाला स्त्रीरूपातच अधिक पाहिलेले आहे. कान्होपात्रा ही मंगळवेढ्याहून प्रथमच पंढरपूरात येऊन विठ्ठलाच्या महाद्वारी बसून विठ्ठलाचे मनभरून दर्शन घेते.

विठ्ठलाच्या चरणाजवळ राहून जन्मोजन्मी दासी होण्याचे भाग्य लाभावे अशी तिची इच्छा आहे. मी दीन आहे. हीन आहे. गणिक आहे. आता तुझ्या चरणी मी आले आहे. कान्होपात्रा बालवयापासूनच मंदिरातील देवदर्शनाला मुकली होती. म्हणून ती विठ्ठलाला याचना व प्रार्थना करताना म्हणते :

दीन पतित अन्यायी । शरण आल्यें विठाबाई ।।
मी तो आहे यातीहीन । नकळे काहीं आचरण ।।
मज अधिकार नाहीं । भेटी देई विठाबाई ।।
ठाव देई चरणापाशीं । तुझी कान्होपात्रा दासी ।।

आमच्या मुखात नामस्मरण नाही. आमचे आचरण शुद्ध नाही. तू सर्वांचे रक्षण करणारा पतितपावन आहेस, अशी कबुली देऊन मी तुझ्याशी शरण आली आहे. अशा प्रसंगी कान्होपात्रा म्हणते :

पतित तूं पावना । म्हणविसी नारायणा ।।
तरी सांभाळी वचन । ब्रीद वागविसी जाण ।।
याती शुद्ध नाहीं भाव । दुष्ट आचरण स्वभाव ।।
मुखी नाम नाहीं । कान्होपात्रा शरण पायीं ।।

बिदरच्या बादशहाचे शिपाई आपणाला घेऊन जाणार आहेत याची तिला जाणीव झाली होती. या संकटातून विठ्ठलच आपणास वाचवू शकतो यावरही तिचा विश्वास होता. म्हणून कान्होपात्राच्या भाषेत परखडपणा जाणवतो. 'तू तर स्वतःला पतितपावन समजतोस, तर भक्ताला संकटातून तुझ्याशिवाय कोण मुक्त करू शकेल ? सिंहाच्या वाटणीच्या खाद्याचा एखादा भाग कोल्ह्याने पळवून नेत असेल, तर सिंहाला लाज वाटायला हवी ? मला पांडुरंगाची दासी होऊन राहण्यातच धन्यता आहे.' ही तिच्या कल्पनेच्या सौंदर्याची उत्तुंगता पुढील अभंगातून स्पष्टपणे जाणवते. ती म्हणते :

पतित पावन म्हणविसी आधीं । तरी कां उपाधी भक्तामागें ।।
तुझें म्हणवितां दुजें अंगसंग । उणेपणा सांग कोणाकडे ।।
सिंहाचे भातुकें जंबुक पैं नेतां । थोराचिया माथां लाज वाटे ।।
म्हणे कान्होपात्रा देह समर्पणें । करावा जतन ब्रीदासाठीं ।।

विठ्ठला, तू अनेक भक्तांच्या मदतीसाठी अनेक रूपे घेऊन धावून गेला आहेस. मलाही या संकटातून वाचव, माझी लाज राख अशी कळकळीची विनंती करताना ती पुढे म्हणते :

अंबऋषीसाठी । जन्म घेतले जगजेठी ।।
वागवी भक्ताचा आधार । ऋणी झाला निरंतर ।।
अर्जुनाचे रथीं बैसे । त्याचे घोडे धूतसे ।
लाज सांडी ऋषीकेशी । कान्होपात्रा तुझी दासी ।।

आता बादशहाचे शिपाई तिला पकडून घेऊन जाणार आहेत. आपला जन्म एका गणिकेच्या पोटी झाला असला, तरी आजपर्यंत मी माझ्या देहाचे पावित्र्य राखले आहे. मी कोणत्याही परपुरूषांकडून माझ्या देहाची विटाळणी होऊ देणार नाही. एका नायकिणीची मुलगी म्हणून लोकांनी मला भोग्य दिले, यामुळे माझा जन्म व्यर्थ गेला. मी तर एक अबला स्त्री आहे. राजसत्तेपुढे कुणाचेही काही चालत नाही. आपल्या जीवाच्या आकांताने ती टाहो फोडीत

विठ्ठलाकडे आर्जवीपणाने संकटमुक्त करण्याची मागणी व विनवणी करते आहे. माझा पवित्र देह वैऱ्याच्या हाती जाऊ नये. अशा बेभान अवस्थेत ती विठ्ठलाचा धावा करताना म्हणते :

नको देवराया, अंत पाहूं आता । प्राण हा सर्वथा फुटों पाहें ।।
हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियले । मजलागीं जाहले तैसे देवा ।।
तुझीवीण ठाण न दिसे त्रिभुवनी । धावें वो जननी विठाबाई ।।
मोकलोनी आस जाहले मी उदास । घेई कान्होपात्रा ह्रदयात ।।

संत कान्होपात्रा ही विठ्ठलावरच रक्षणाची जबाबदारी सोपवून ती आपल्या शिष्याप्रती वा भक्तांप्रती कर्तव्याची जाणीव करून देते. विठ्ठलाच्या चरणावर ती समर्पित होण्यासाठी दुःखाची किंकाळी व करूणेचा टाहो फोडते. तिच्या गदगदलेल्या अंतःकरणाने ती विठ्ठलनामाचा धावा करते. ही तिची प्रार्थना तिच्या आत्म्याचे आक्रंदन होते. अखेर विठ्ठलाने तिच्या ह्रदयाची प्रार्थना ऐकून घेऊन तो कान्होपात्राला स्वचरणी समर्पित करून घेतले. आपल्यात विलीन करून घेतले. तिचा पवित्र देह विटंबण्यापासून तिला मुक्त केले. विठ्ठलांनी कान्होपात्राला कायमचेच जीवनमुक्त केले.

**निष्कर्ष :**

१) कान्होपात्रा ही एका नायिकीणीची मुलगी असून तिचे प्रथम नाव कान्हो किंवा कान्हू असावे, तर 'पात्रा' यातून व्यवसायाचा निर्देश होतो.

२) कान्होपात्राचे अभंग म्हणजे तिचे आत्मचरित्रच म्हणावे लागते, ज्यातून तिने गणिकेच्या पोटी जन्म झालेल्या एका स्त्री जीवनाच्या वेदना सांगतांना दिसते.

३) कान्होपात्राच्या अभंगात भक्ती व कारूण्याचा रस असून तिची भाषा सहज, सुंदर, प्रेमळ आहे. तरी कधी तिच्या भाषेत परखडपणाही स्पष्टपणे जाणवतो.

४) कान्होपात्राचे अभंग हे संख्यात्मक कमी असले, तरी ते श्रेष्ठ गुणयुक्त आहेत.

५) कान्होपात्राच्या अभंगात ईश्वरमहिमा, पंढरीमाहात्म्य, भक्तीची उत्कटता, समर्पणभाव, व्याकुळता व आपल्या जन्माच्या हीनतेची भावनाही चित्रित झाली आहे.

६) कान्होपात्राच्या अभंगात पौराणिकतेचे संदर्भ आणि स्त्रियांच्या व्यथा-वेदनांच्या किंकाळ्या आहेत.

७) कान्होपात्राच्या अभंगात विठ्ठलभक्ती आहे. विषयवासनेचा निषेध करणारे व उपदेश करणारेही तिचे अभंग आहेत.

८) कान्होपात्राचा पूर्वसंचितावर विश्वास असून पाप-पुण्यामुळेच माणसाला त्याच्या जीवनात सुख व दुःख भोगावे लागतात, अशी तिची स्पष्ट धारणा होती.

९) कान्होपात्राला आपल्या देहाची विटंबना करून पशू-प्राण्याप्रमाणे अपमानास्पद जीवन जगणे मान्य नव्हते.

१०) कान्होपात्राची प्रतिभा अलौकिक होती. एका विद्वानासारखी तिची भाषा व शब्दांना अर्थ देण्याचे तिचे बौद्धिक कौशल्य हे वाचकाला अंतर्मुख करावयास लावणारे आहे.

११) कान्होपात्राच्या अभंगात आत्मप्रकटीकरणाची तळमळ व हळहळ आहे. तिने सर्वसामान्य माणसांच्या आटोक्यात नसणारे वेद, ज्ञानमार्ग व योगमार्ग नाकारून भक्तिमार्गाच्या श्रेष्ठत्वाचे प्रतिपादन केले आहे.

**संदर्भ ग्रंथ**

विद्यासागर पाटंगणकर (संपा.), मराठी संत कवयित्रींचा इतिहास, साहित्य अकादेमी नवी दिल्ली, प्रथमावृत्ती-२०१५, पृ.क्र.९८.